**प्रकल्प पार्श्वभूमी:-**

महाराष्ट्र शासनाने हवामानातील बदलांमुळे उद्भवणा-या प्रतिकूल परिणामांचा सामना करण्यासाठी जागतिक बँकेच्या सहकार्याने “नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प” राबविण्यास मंजुरी दिली आहे. प्रकल्पात निवडलेल्या जिल्ह्यातील कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा, विशेषतः गरीब व मागासवर्गीय शेतकरी वर्गाची, बदलत्या हवामानाशी अनूकुलन वृद्धींगत करण्यासाठी तसेच त्यांना स्थिर व सुरक्षित उपजीविका उपलब्ध करून हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील निवडक जिल्हयांतील शेतकऱ्यांना हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायतशीर करण्यास सहाय्य करणे हा प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे. महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यांमधील ५१४२ गावांचा समावेश या प्रकल्पामध्ये करण्यात आला आहे आणि यामध्ये पूर्णा नदीच्या खोऱ्यामधील ९३२ खारपाण पट्ट्यातील गावांचा समावेश आहे. या प्रकल्पामध्ये मुख्य तीन घटक आहेत.

(अ) **हवामान अनुकूल कृषि पद्धती**

उपघटक:-

(अ१) गावसमुहाचे सहभागीय पद्धतीने सुक्ष्म नियोजन

(अ२) हवामान अनुकूल कृषि पद्धती

(अ३) पाण्याचा कार्यक्षम व शाश्वत पद्धतीने वापर

**(ब) काढणी पश्चात व्यवस्थापन व हवामान अनुकूल मूल्य साखळी प्रोत्साहन**

उपघटक:-

(ब१) शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रोत्साहन

(ब२) शेत माल मूल्य वृद्धीसाठी हवामान अनुकूल उदयोन्मुख मूल्य साखळ्यांचे बळकटीकरण

(ब३) हवामान अनुकूल बियाणे वितरण प्रणालीची कार्यक्षमतत वृद्धी

**(क) हवामानास अनुकूल कृषि पध्दतीसाठी संस्थात्मक विकास, ज्ञान व धोरणे**

**उपघटक:-**

(क१) शाश्वत व संस्थात्मक क्षमता विकास

(क२) महाराष्ट्र हवामान अभिनव केंद्र

(क३) ज्ञान व धोरणे

**सामाजिक व्यवस्थापन आणि आदिवासी लोक नियोजन संरचनेचे उद्दिष्ट्ये:-**

सामाजिक मूल्यांकन अभ्यासाचा उद्देश हा "सामाजिक विकासातील समस्यांना चांगल्या प्रकारे समजून घेणे आणि निदर्शनास आणणे व परिणामी त्यांचा समावेश, संबद्धता, समानता, सुरक्षितता, विकेंद्रीकरण आणि उत्तरदायित्वाची पूर्तता करणे आहे".

आदिवासी लोक व्यवस्थापन संरचनेच्या उद्दीष्ट्ये (१) आदिवासी लोकांना पुरेसे मार्गदर्शन करणे, प्रकल्प उपक्रमाची तयारी, अंमलबजावणी आणि देखरेख प्रक्रियेत समावेश करून घेणे (२) प्रकल्पाच्या लाभामध्ये समान फायदे व विशेष सहाय्य देणे (३) संस्थात्मक व्यवस्थेचे माहिती देणेसाठी यंत्रणा आणि तक्रार निवारण यंत्रणा निर्माण करणे आणि (४) सनियंत्रण आणि तपासणी व्यवस्था निर्माण करणे, ही आहेत.

**दृष्टिकोन आणि कार्यप्रणाली:-**

सामाजिक मूल्यांकन हे सहभागी पद्धतीने करण्यात आले आहे. अल्प, अत्यल्प भूधारक आणि महिला शेतकरी, अनुसूचित जाती, आदिवासी, दिव्यांग आणि इतर प्रकल्प भागधारकांच्या प्रतिनिधींसोबत सल्लामसलत करण्यात आली. या दस्तावेजात त्यांचे विचार व दृष्टीकोन यांचा समावेश करण्यात आला आहे. या दस्तावेजात प्राथमिक आणि दुय्यम माहितीचे संकलन, विश्लेषण करून सध्याच्या सामाजिक स्थितीचे चित्र तयार करण्यात आले आहे. त्यानुसार व्यवस्थापन आराखडा देखील तयार करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी सुयोग्यरित्या होणेसाठी प्रणाली विकसित करण्यात आली आहे. भागधारकाची क्षमता बांधणी करणेविषयीचा आराखडा देखील यामध्ये समाविष्ट आहे. क्षेत्रीय भेटीद्वारे एकत्रित केलेल्या प्राथमिक माहिती मध्ये राज्य शासनाच्या हवामान अनुकूल विषयक विविध योजनांविषयक माहितीचे देखील संकलन केलेले आहे.

**सामाजिक व्यवस्थापन संरचनाचे घटकः-**

सामाजिक व्यवस्थापन संरचनेमध्ये प्रकल्प आढावा, विकासाची उद्दीष्ट्ये, संरचनेच्या मूल्यांकन प्रक्रियेसाठी अवलंबविण्याची पद्धती आणि मुख्य भागधारकांचा सल्ला समाविष्ट आहे. याचबरोबर केंद्र व राज्य शासनाचे अधिनियम व धोरणे आहे, संस्थात्मक रचना आणि नियम, राज्याची जनसांख्यिकी, भूधारणा, व्यवसाय, उत्पन्न, लिंगसापेक्ष बाबी आणि आदिवासी घटक याचा समावेश आहे. प्रकल्प अंमलबजावणीचे दरम्यान एखादवेळेस कोणताही संभाव्य प्रतिकूल परिणाम समाज जीवनावर झाल्यास त्याचा प्रभाव कमी करण्याविषयीची उपाययोजना देखील यामध्ये उद्धृत आहे. लिंगसापेक्ष प्रकल्प कृति आराखडा, आदिवासी लोक नियोजन व सामाजिक व्यवस्थापन संरचनेमध्ये अंमलबजावनी आराखडा, सामाजिक घटकांची क्षमता बांधणी व संस्थात्मक व्यवस्था अंतर्भूत आहे.

**कायदे आणि नियमांची संरचना :-**

प्रकल्प क्षेत्रात लागू असलेल्या केंद्रीय आणि राज्य सरकारच्या प्रमुख धोरणे, कायदे व नियम खालील प्रमाणे आहे.

1. पंचायत राज अधिनियम

2. पंचायत (अनुसूचित क्षेत्रांमध्ये विस्तार) अधिनियम, 1996

3. वन अधिकार अधिनियम, 2006

4. अनुसूचित जाति आणि अनुसूचित जमातींची संवैधानिक व्याख्या

5. पांचवी अनुसूची [अनुच्छेद 244 (1)]

6. अनुसूचित जाति आणि जमातींसाठी संवैधानिक संरक्षण

7. आदिवासी विकास आणि आदिवासी उप-योजना

8. महिला शेतकर्यांसाठी राष्ट्रीय धोरण (2007)

9. शेतीविषयक गंभीर समस्या आणि महाराष्ट्र शासनाचे धोरण

**जागतिक बँकेच्या सुरक्षिततेचे धोरणे:-**

या धोरणांचे उद्दीष्ट विकास प्रक्रियेतीमुळे अपरिहार्य कारणांमुळे होणारी नागरिकांची होणारी हानी आणि त्यांच्या पर्यावरणावर होणारे अपायकारक परिणाम टाळणे आणि कमी करणे, हे आहे. सुरक्षिततेचे धोरणांचा परिपाक हा प्रकल्प आराखडा आणि त्यातील भागधारकांच्या सहभागसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि स्थानिक लोकांमध्ये प्रकल्पातील घटकांविषयीची मालकीची भावना निर्माण करणे आहे, हा आहे. जागतिक बँकेची सुरक्षितता धोरण हे सामाजिक व्यवस्थापनाशी निगडीत असून त्याच्या OP/OB 4.10 परिशिष्ठ मुलनिवासी लोकांशी संबंधित आहे. या परिशिष्ठाचे उद्दिष्ट्य 'मुलनिवासी लोकांची प्रतिष्ठा, मानवाधिकार आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये अबाधित राखणे आणि त्यांना (1) सांस्कृतिकदृष्ट्या सामाजिक आणि आर्थिक लाभ प्राप्त होतील (2) विकास प्रक्रियेदरम्यान प्रतिकूल परिणाम सोसावा लागणार नाही, अशी व्यवस्था करणे', हे आहे.

**मुख्य सामाजिक समस्या**:-

प्रकल्पात अंतर्भूत असलेले सामाजिक मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

(1) शेतीचा वृद्धीचा दर इतर क्षेत्रापेक्षा कमी असून 50% लोक उपजीविकेसाठी कृषि संलग्न व्यवसायावर अवलंबून आहेत

(2) शेतक-यांच्या भुधारणाविषयक श्रेणींमध्ये सरासरी जमीन धारणा घटत आहे

(3) शेतीपासून मिळणारे उत्पन्न कमी होणे हे शेतक-यांच्या वाढत्या चिंतेचे प्रमुख कारण आहे.

(4) मराठवाडा आणि विदर्भामध्ये मानव विकास निदेशांक आणि प्रति व्यक्ति उत्पन्न तुलनेने कमी आहे.

(5) सर्व सामाजिक स्तरात पुरुषांच्या तुलनेत महिलांचा साक्षरता दर कमी आहे.

प्रकल्पाच्या संदर्भात विश्लेषणात्मक पद्धतीने सामाजिक व्यवस्थापन रचनेसाठी तीन महत्त्वपूर्ण गोष्टींचा विचार करणे गरजेचे आहे. (1) कमी खर्चात होणाऱ्या शेतीमध्ये सुधारणा आणि वैकल्पिक उपजीविकेचे साधने (2) लिंग समानता (3) प्रकल्पात प्रामुख्याने सिमांतिक शेतकरी आणि अनुसूचित जाती व जमातीतील शेतक-यांचा समावेश करणे आहे.

**सामाजिक व्यवस्थापन संरचना:-**

सामाजिक व्यवस्थापन संरचने मध्ये वेगवेगळ्या भागधारकांच्या मुख्य समस्या आणि विविध प्रकल्प घटकांवरील त्यांच्या सूचना विचारात घेण्यात आल्या आहेत. सामाजिक संरचना तयार करतेवेळी, अत्यंल्प व अल्प भुधारक शेतक-यांना प्रकल्पाचा लाभ प्रत्यक्षपणे मिळण्याच्या दृष्टीकोनातून प्रकल्पाचे घटक निर्धारीत केलेले आहेत.

**समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रकल्पाचा आराखडा** :-

समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रकल्पाचा आराखडा तयार करताना विचारात घेतलेली प्रमुख बाबी - (१) विकेंद्रित दृष्टिकोन (२) स्थानिक ग्राम पंचायत आणि ग्राम कृषि संजीवनी समितीची स्थापना व त्याद्वारे प्रकल्पाचे नियोजन, अंमलबजावणी व सनियंत्रणासंबंधी शेतकरी समुदायामध्ये सक्रिय सहभाग व स्वामित्वाची भावना निर्माण करणे (४) प्रकल्पात सर्व समाजांचा समावेश व समन्यायी पद्धतीचा अवलंब 5) प्रकल्प अंमलबजावणीच्या स्तरावर पारदर्शकता व जबाबदारी 6) गाव समूह आराखडा तयार करणेविषयक नियोजन. (६) प्रकल्पात्कडून दिलेल्या साधसुविधांची शाश्वतता (७) क्षमता बांधणी (८) अनुसूचित क्षेत्र व आदिवासी विकास**,** लिंग समानता साधने (९) अनुसूचित क्षेत्रांमध्ये (PESA**)** अधिनियमाच्या तरतुदींचे देखील पालन केले जाईल जेणेकरुन आदिवासी समाज योजना अंमलबजावणी आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होईल.

**लिंग समानता कार्य योजना (Gender Action Plan):-**

सामाजिक मूल्यांकना दरम्यान लिंग असमानता संबधी मुद्दे समजून घेण्यासाठी आणि प्रकल्पांतर्गत निरनिराळ्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी विविध भागधारकांसोबत सल्लामसलत करण्यात आलेली होती. प्रकल्पासाठी लिंग असमानता ही महत्त्वपूर्ण समस्या आढळून आलेली आहे.

1. सामुदायिक संस्थांमध्ये सक्रिय सहभाग काही स्त्रियांपर्यंत मर्यादित आहे.
2. दीर्घ कालावधीपर्यंत सुरू असलेली शेतीतील कामे/ कापणीपश्चात कामे यामुळे माहिलांच्या आरोग्यावर परिणाम दिसून येतात.
3. महिलापुरक शेती अवजारांच्या अभावामुळे स्त्रियांच्या अधिक कष्ट पडतात.
4. शेती तंत्रज्ञानाविषयक कमी जागरूकता असते
5. विस्तार सेवा आणि संस्थात्मक सुविधांचा अभाव
6. शेती संबंधित कामाविषयीचे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत महिलांशी पुरेश प्रमाणात सल्ला-मसलत केली जात नाही.
7. महिला शेतामध्ये स्वयंचलित अवजारांचा वापर करत नाहीत तसेच बहुआयामी कामे उदा. निंदनी, खुरपणी, भर घालणे इ. करत असतात यामुळे महिलांवर अधिकचा ताण पडतो.
8. महिलांना विशिष्ठ कामासाठी पुरुषांपेक्षा कमी मोबदला मिळतो.

**लिंग समानता कार्य योजनासाठी प्रकल्प धोरणे**:-

प्रकल्पात महिलांचा सहभाग वाढविण्याचा महिलांकरिता सुलभ व सहजरीत्या लागू होणा-या बाबींचा अवलंब करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. प्रकल्पातून स्त्रियांना अधिकाधिक बाबींचा लाभ देण्यात येणार आहे. याशिवाय प्रकल्पातील विविध घटकांची संरचना करताना स्त्रीकेंद्रीत मुद्द्यांवर विशेष भर दिलेला आहे यामुळे प्रकल्पात स्त्रियांचा सहभाग व निर्णयक्षमता वृद्धींगत होणार आहे. तसेच प्रकल्पाची व्याप्ती वाढणार आहे. प्रकल्पात 'महिला लाभार्थी' करिता सर्वसमावेशक व्याख्या (operational definition) निर्धारित केलेली असून यामुळे कोणतीही महिला प्रकल्पाच्या लाभापासून वंचित राहणार नाही.

**आदिवासी समुदाय मूल्यांकनः-**

या सामाजिक मूल्यांकनाचे उद्दीष्ट आदिवासी समुदायावर प्रकल्पातील बाबींमुळे होणारे संभाव्य परिणाम आणि सदर परिणांचा विचार करून प्रकल्पाची अंमलबजावणी पद्धती सुरक्षितता धोरणांच्या अनुषंगाने विकसित केलेली आहे. यामुळे आदिवासी समुदायाचा सहभाग प्रकल्पात सुनिश्चित करणे सोयीचे होणार आहे. एतिहासिक काळापासून आदिवासी समुदायाच्या विकासास बाधा आणणारे घटक आता हळू हळू कमी होत आहेत हा केंद्र व राज्य शासनाच्या विविध उपाययोजनांचा परिपाक आहे, असे अभ्यासात आढ्ळूना आले आहे. प्रस्तूत प्रकल्पाच्य मांडणीचेवेळी केलेल्या अभ्यासानुसार आदिवाशी समुदायांना संबंधित आढळलेले ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

1. आदिवासी समुदायाची वन्यजमिनीशी झालेली फ़ारकत याचा ठळक परिणाम आदिवासी समुदायाकडील उपजिवीकेची साधने तुटपुंज्या स्वरूपात उपलब्ध असण्यावर झालेला दिसतो. प्रकल्पाचे सुरक्षितता धोरण हे संविधानात नमूद असलेल्या नियमावलीस अनुसरून असून या माध्यमातून आदिवासी समुदायाची वन्यजमिनीशी झालेली फ़ारकत ह्याची दखल घेतली आहे.
2. शेतीवर अवलंबून असणाऱ्या आदिवासी कुटूंबासाठी 'वन अधिकार अधिनियम २००६' (Forest Rights Act 2006) नुसार वन्य जमिनीचे वाटप करणे सुलभ झाले आहेत.
3. जंगलावर आदिवासी समुदायांना अधिकार देण्यासाठी वन अधिकार कायदा उपयुक्त ठरला आहे.
4. या कायद्यामुळे लाकूड वगळता अन्य वनउपजांचा आणि त्याची विक्री करणे सोयीचे झाले आहे.
5. महाराष्ट्रामध्ये वनपट्टे दिलेले असून यामध्ये आदिवासी समाजाचा देखील अंतर्भाव आहे. अनुसुचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी (वनहक्क मान्य करणे अधिनियम, 2006) ची अंमलबजावणी करून परंपरागत किंवा रुढीगत हद्दीतील वनक्षेत्राचा वापर करण्याचे अधिकार देणारे महाराष्ट्र हे एक प्रगतीशील राज्य आहे.
6. आवश्यक कौशल्यांच्या अभावामुळे वेगवेगळ्या ठिकाणी काम करण्यास पुरेशा संधी उपलब्ध नसने, ही महत्त्वाची समस्या आहे.
7. स्थानिक प्रशासकीय यंत्रणेचे विकेंद्रीकरण होत आहे. तसेच स्थानिक गरजांनुसार नियोजन, पेसा (PESA) ग्राम पंचायतींना थेट रुपात निधीची उपलब्धता आणि विकास कामांच्या मंजूर आराखड्यांची स्थानिक पातळीवर अंमलबजावणी यामुळे प्रशासकीय यंत्रणा सशक्त होत आहे.

प्रकल्पाच्या घटक राबविण्याच्या वेशिष्ठ्यपूर्ण कार्यपद्धतीमुळे आदिवासी भागामध्ये आदिवासी समाजास योग्य प्रतिनिधित्व आणि प्रकल्पाचा अधिकाधिक लाभ मिळणार आहे.

**आदिवासी लोक नियोजन आराखडा आणि सामजिक व्यवस्थापन आराखडा अंमलबजावणी:-**

प्रकल्प व्यवस्थापन कक्ष आदिवासी लोक नियोजन आराखडा आणि सामजिक व्यवस्थापन आराखडा करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करेल. प्रकल्प व्यवस्थापन कक्षामध्ये एक समाजशास्त्र तज्ञ कार्यरत आहे. प्रकल्पाचा समाजशास्त्र तज्ञ सामाजिक व आदिवासी जमातीशी निगडीत बाबींच्या पर्यवेक्षण करतील आणि विविध आस्थापना व संस्थांशी समन्वय ठेवतील. प्रकल्प व्यवस्थापन कक्ष व जिल्हा स्तरावरील प्रकल्प अंमलबजावणी कक्षातील प्रकल्प अधिकाऱ्यांना प्रकल्पातील विविध सामाजिक मुद्दे हाताळण्यासाठी प्रशिक्षित केले जाईल. यामुळे सदयास्थितील असलेल्या सामाजिक मुद्दे प्रभावीरित्या व सक्षमपणे हाताळणे सोयीचे होईल. प्रकल्पांतर्गत क्षमता बांधणी कार्यक्रमाद्वारे प्रकल्प घटकांवर प्रभाव टाकणा-या सद्यस्थितीतील सामाजिक मुद्द्यांचे निराकरण करणे आणि सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या व वंचित समाजास अधिकाधिक लाभ मिळवून देण्याविषयी मार्गदर्शन करण्यात येईल.

**तक्रार निवारण यंत्रणा:-**

प्रकल्पाची अंमलबजावणी करतांना काही तक्रारी उद्भवू शकतात व त्याचे ठराविक कालावधीत निराकरण होणे आवश्यक आहे. सर्वसाधारण गटातील लोकांच्या व विशेषतः आदिवासी लोकांच्या (असल्यास) तक्रारींचे निराकरण करण्यासाठी प्रकल्पात तक्रार निवारण यंत्रणा कार्यरत असेल. तक्रार निवारण यंत्रणा ही गाव, गावसमूह, उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरापासून प्रकल्प व्यवस्थापन कक्षस्तरा पर्यंत कार्यरत असेल व त्यामध्ये तक्रार निवारण यंत्रणा ही प्रकल्पाची अंगीभूत यंत्रणा असेल. प्रकल्पाकडून तक्रारींचे कालबद्ध निराकरण करण्यासाठी एक दूरध्वनी क्रमांक प्रसारीत केला जाईल. माहिती तंत्रज्ञानाचा वापर तक्रारी प्राप्त करून घेणे, त्याची दखल घेणे आणि निवारण करणे यासाठी केला जाईल. शेतकरी व ग्राम कृषि संजीवनी समिती यांचेकडून प्राप्त होणा-या तक्रारीं, निराकरण झालेल्या तक्रारींची संख्या, तक्रार निवारण करण्यासाठी लागणारा वेळ आणि घेण्यात आलेला निर्णय याचे दप्तर तयार करण्यात येईल. माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून तक्रार निवारण यंत्रणेकडील माहिती संगणकीकृत केल्या जातील यामुळे ही सर्व माहिती सहजपणे उपलब्ध होईल.